महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

OW/DCP TRAFFIC/ADM/NOTIFICATION/ 998 /2022 DATE :- 13 /12/2022

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**संदर्भ** :– 1) MSRDC/02/JMD(ENGG-1)/BKSP/Six Lanning/Palawa junction/F.No.204/7809, Date -25/11/2022.
2) कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे जा.क्र. ८८५/२०२२, दि. ०६/१२/२०२२.

*******

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई अंतर्गत लोढा पलावा जंक्शन येथील देसाई खाडीवर नवीन पूल निर्माण करण्याचे काम चालू असून नवीन पुलाचे काम करण्यासाठी कल्याण फाटा कडून कल्याणकडे जाणाऱ्या वाहिनीवर मोठे क्रेन ठेवून सिमेंट गर्डर ठेवण्याचे काम करावयाचे आहे. त्यासाठी दि. १५/१२/२०२२ ते दि. २२/१२/२०२२ रोजी पावेतो रात्रौ २३:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो सदर पूलावरील वाहिनी वाहतूकीकरीता बंद करुन सदर भागातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित व्हावी व नागरीकांची गैरसोय होवू नये याकरीता, आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद :–** कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना कल्याण फाटा येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** १) कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणारी सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहने ही कल्याण फाटा–मुंब्रा बायपास मार्गे–खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** कल्याण कडून कल्याण फाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना बदलापूर चौक येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** २) कल्याण कडून कल्याण फाटा कडे जाणारी सर्व प्रकारच्या जड–अंवजड वाहने ही बदलापूर चौक–खोणी नाका–तळोजा एमआयडीसी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना ही खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होई पर्यत अंमलात राहील.

१) दि. १५/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १६/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
२) दि. १६/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १७/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. १७/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १८/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. १८/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १९/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. १९/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २०/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. २०/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २१/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. २१/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २२/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत
३) दि. २२/१२/२०२२ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. २३/१२/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वाजे पर्यत

**सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.**

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे.
**२/–** सदर अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

- मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- मा .पोलीस आयुक्त, ठाणे शहर
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
- मा. जिल्हाधिकारी, ठाणे
- मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण,
- नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.
- ठाणे पोलीस पत्रक

प्रत – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सहायक पोलीस आयुक्त, ठाणे/कल्याण/उल्हासनगर वाहतूक विभाग.

पोनि कळवा, मुंब्रा, कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CS CamScanner